पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
मा. अ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक १
सभावृत्तांत

दिनांक – ०६/०४/२०१६ वेळ : सकाळी १०.३०

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. अ प्रभाग समितीची मा. सभापती निवडीची विशेष सभा बुधवार दिनांक ०६/०४/२०१६ रोजी सकाळी १०.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकर रामचंद्र पवळे सभागृहात मा. श्रीमती. प्रेरणा देशभ्रतार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. वैशाली जालिंदर काळभोर
२. मा. बाबर शारदा प्रकाश
३. मा. उल्हास शेट्टी
४. मा. सुभद्रा ईश्वर ठोंबरे
५. मा. भारती फरांदे
६. मा. आर.एस.कुमार
७. मा. जावेद रमजान शेख
८. मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
९. मा. पांढरकर निलेश शंकरराव
१०. मा. राजू मिसाळ
११. मा. नंदा विकास ताकवणे
१२. मा. नेटके सुमन राजेंद्र
१३. मा. तरस बाळासाहेब जयवंत
१४. मा. पवार मनिषा काळूराम
१५. मा. टेकवडे सुजाता अविनाश

याशिवाय मा. श्री. प्रशांत खांडकेकर, क्षेत्रीय अधिकारी, अ क्षेत्रीय कार्यालय, मा. श्रीम. रेखा गाडेकर, प्रशासन अधिकारी, अ क्षेत्रीय कार्यालय हे उपस्थित होते.

-------

**अतिरिक्त महानगरपालिका : आयुक्त , पुणे महानगरपालिका (पिठासीन अधिकारी)** सन्मा. सदस्य, क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करते. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा. विभागीय आयुक्त यांनी सभेची पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. अ प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार

पाडण्यासाठी_कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सूचना करते.**

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव ( सभाशाखा)**

मा. अ प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकूण २ नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्यांचे सूचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | पांढरकर निलेश शंकरराव | काळभोर वैशाली जालिंदर | टेकवडे सुजाता अविनाश |
| २. | पांढरकर निलेश शंकरराव | भारती फरांदे | भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर |

**मा.पिठासीन अधिकारी :**

मा. अ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त एक उमेदवाराच्या एकूण २ नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली असून दोन नामनिर्देशन पत्रे वैध ठरलेली आहेत.
त्यामध्ये मा. अ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. पांढरकर निलेश शंकरराव हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे देवून त्यांची उमेदवारी मागे घेता येईल.

मा. पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला सकाळी १०.३५ ते १०.५० हा १५ मिनिटांचा कालावधी दिला.

उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या कालावधी मध्ये उमेदवाराने उमेदवारी माघारीचा अर्ज दिला नाही.

ठराव क्रमांक – १
दिनांक – ०६/०४/२०१६

विषय क्रमांक – १
विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. अ प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेकरिता श्री. पांढरकर निलेश शंकरराव या उमेदवाराने एकूण दोन नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल केलेली असून दोनही नामनिर्देशनपत्रे वैध ठरलेली आहेत. अ प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेसाठी श्री. पांढरकर निलेश

शंकरराव हे एकच उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अ प्रभाग समिती सभापती म्हणून रितसर वैधरित्या निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

यानंतर पिठासीन अधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(प्रेरणा देशभ्रतार)
पिठासीन अधिकारी तथा
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका,पुणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी ४४
क्रमांक : अक्षेका/११/कावि/१६०/२०१६
दिनांक : ०६/०४/२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभाशाखा
अ प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८.**

**अ प्रभाग समिती**

---

**ठराव क्रमांक : १** | **विषय क्रमांक : १**

**दिनांक : ०६/०४/२०१६** | **विभाग : प्रशासन**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समिती सभापती पदासाठी निवडणूक लढविणारे श्री. पांढरकर निलेश शंकरराव हे एकच वैधरित्या नामनिर्देशित उमेदवार असल्याने श्री. पांढरकर निलेश शंकरराव यांची अ प्रभाग समितीचे सभापती पदावर बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**सही/-**
**(प्रेरणा देशभ्रतार)**
**पिठासीन अधिकारी तथा**
**अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका, पुणे.**

(श्री. पांढरकर निलेश शंकरराव यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

ठराव क्रमांक – २ | विषय क्रमांक - २
दिनांक - ०६/०४/२०१६ | विभाग - प्रशासन
सूचक - मा. जावेद शेख | अनुमोदक - मा. नंदा ताकवणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची मासिक सभा प्रत्येक महिन्याचे दुस-या बुधवारी दुपारी १२.०० वाजतां घेण्यात येईल.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
( पांढरकर निलेश शंकरराव)
अध्यक्ष
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी ४४
क्रमांक : अक्षेका/११/कावि/१६०/२०१६
दिनांक : ०६/०४/२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभाशाखा
अ प्रभाग समिती